
# प्रकरण १ भारताची सुरक्षा : संकल्पनात्मक चौकट




राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे काय? देशाच्या प्रादेशिक सीमा, सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्याचे संरक्षण करणे म्हणजे राष्ट्रीय सुरक्षा होय. पारंपरिक पद्धतीने विचार केला तर राष्ट्रीय सुरक्षा म्हणजे बाह्य आक्रमणापासून राज्याचे रक्षण करणे असे मानले जाते. राष्ट्रीय सुरक्षेची ही फक्त लष्करी बाजू आहे. या लष्करी पैलूबरोबरच राष्ट्रीय सुरक्षेचे इतरही पैलू आहेत आणि तेही तितकेच महत्त्वाचे आहेत. देशाचे खऱ्या अर्थाने संरक्षण करायचे तर या व इतर प्रकारचे संरक्षणही आवश्यक ठरते. त्यात राजकारण किंवा राजनैतिक हालचाली (राजनय), समाज, पर्यावरण, उद्योग, ऊर्जा व इतर नैसर्गिक साधनसंपत्ती आर्थिक आणि मनुष्यबळाचाही समावेश होतो.

संरक्षण धोरणाचा व्यापक पद्धतीने विचार करताना त्यात देशाचा आर्थिक, सामाजिक व तंत्रज्ञानाचा पाया, सामाजिक व सांस्कृतिक एकजिनसीपणा, राजकीय स्थैर्य व विजीगिषू वृत्ती आणि कार्यक्षम राजनय आदी बाबींचा समावेश होतो. त्याशिवाय देशातील अंतर्गत परिस्थिती आणि राष्ट्रीय संरक्षण धोरण यांचे संबंधही विचारात घ्यावे लागतात.

कोणत्याही देशाचे संरक्षण धोरण अमूर्त नसते. त्याला नेहमी दोन प्रकारचे संदर्भ असतात – एक आंतरराष्ट्रीय आणि दुसरा देशांतर्गत परिस्थिती. देशाच्या इतर राष्ट्रांबरोबरच्या संबंधांमध्ये बदल झाला की त्याचे परिणाम संरक्षण धोरणावर होतात. देशांतर्गत परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रीय सामर्थ्यामध्ये समाविष्ट होणाऱ्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व इतर घटकांवरील मर्यादांचा विचार संरक्षण धोरण ठरवताना करावा लागतो.

## भारताचे संरक्षण धोरण

भारताच्या संरक्षण धोरणाचा अभ्यास करताना आपल्याला पुढील बाबींवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे.

**१. बाह्य सुरक्षा आणि सामरिक मर्यादा :**

- **राजनयिक :** आंतरराष्ट्रीय संबंधांमध्ये होणारे बदल आणि भारताच्या संरक्षणाला असलेल्या पारंपरिक व नव्या धोक्यांचे परिणाम यांचा समावेश होतो.
- **लष्करी :** यात पारंपरिक युद्ध, अंतर्गत सुरक्षेच्या समस्या, तसेच आण्विक, रासायनिक व जैविक प्रकारातील विध्वंसक अस्त्रांपासून असलेल्या धोक्यांचा समावेश होतो.
- **आर्थिक :** जागतिक अर्थकारण आणि व्यापारासंबंधी धोरणांतील बदलांमुळे होणाऱ्या परिणामांचा यात समावेश होतो.

**२. देशांतर्गत घटक :**

- **विज्ञान-तंत्रज्ञान :** विज्ञान व तंत्रज्ञानातील विकासातून संरक्षण दलांचे आधुनिकीकरण केले जाते.
- **आर्थिक :** देशाची आर्थिक स्थिती मजबूत असेल तर सुरक्षेवर त्याचा योग्य परिणाम होतो.
- **सामाजिक-राजकीय स्थिती :** देशातील सामाजिक व राजकीय स्थैर्य आणि त्याचे अंतर्गत सुरक्षेवर होणारे परिणाम
- **लोकसंख्येतील बदल :** यात स्थलांतरासारख्या समस्यांचा समावेश होतो.

भारताच्या संरक्षण धोरणात स्वातंत्र्य, अंतर्गत सुरक्षा आणि प्रादेशिक एकात्मता यांना सर्वाधिक प्राधान्य आहे. याचबरोबर स्वातंत्र्य मिळाल्यापासूनचा भारताचा शांतताविषयक दृष्टिकोन त्यात केंद्रस्थानी राहिला आहे. राष्ट्रीय सुरक्षेकडे पाहण्याच्या भारताच्या दृष्टिकोनात दोन बाबींना महत्त्व आहे :

(i) कोणत्याही संघर्षाकडे पाहताना त्याच्या मूळ कारणांवर उपाय केला पाहिजे, यावर भारताचा विश्वास आहे.

(ii) कोणताही संघर्ष सर्वप्रथम शांततामय मार्गाने सोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. सामान्यपणे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक क्षेत्रांतील ताणतणावातून संघर्ष उत्पन्न होतो. असे संघर्ष परस्पर संवाद आणि राजनैतिक मार्गांनी सोडवले पाहिजेत. आंतरराष्ट्रीय राजकारणात या पद्धतींना वाद सोडवण्याचे 'प्रशांत वाटाघाटींचे मार्ग' (पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्स) असे म्हटले जाते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**'प्रशांत वाटाघाटींचे मार्ग' (पॅसिफिक सेटलमेंट ऑफ डिस्प्युट्स) म्हणजे काय?**

संयुक्त राष्ट्रांच्या सनदेतील ३३ व्या कलमामध्ये दोन किंवा अधिक देशांमधील वाद मिटवण्याचे पुढील मार्ग सांगितले आहेतः वाटाघाटी, चौकशी, मध्यस्थी, तडजोड, लवाद, न्यायालयीन निर्णय, प्रादेशिक संस्था-संघटनांमार्फत मध्यस्थी किंवा संबंधित देशांनी स्वीकारलेले इतर शांततामय मार्ग.

**भारताच्या संरक्षण धोरणावर पुढील तीन घटकांचा मोठा प्रभाव राहिला आहे :**

**(i) धोक्याचे आकलन :** प्रादेशिक पातळीवर भारताला पाकिस्तान आणि चीन या शेजारी देशांपासून धोका आहे. त्यावरच आपले प्राथमिक लक्ष केंद्रित झाले आहे. याशिवाय इतर प्रादेशिक सत्तांचा धोकाही भारताला संभवतो. पाकिस्तान आणि चीनकडून असलेला धोका प्रामुख्याने सीमांवरील पारंपरिक संघर्षाचा आहे. त्यात काळाच्या ओघात अंतर्गत बंडखोरी, दहशतवाद्यांना मदत; याबरोबरच अण्वस्त्रांच्या प्रसारामुळे परिस्थिती आणखी गुंतागुंतीची झाली आहे. इतर प्रादेशिक सत्तांच्या बाबत बोलायचे तर त्यांचा धोका अप्रत्यक्ष आहे. भारताशी संबंधित विषयांमध्ये हस्तक्षेप किंवा भारतविरोधी शक्तींना मदत देण्याच्या स्वरूपात तो असू शकतो.

**(ii) स्वावलंबन :** अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात स्वावलंबी बनण्याला भारताने नेहमी प्राधान्य दिले आहे. देशाचा औद्योगिक पाया विस्तारण्यावर भारताने लक्ष केंद्रित केले आहे. उद्योगांच्या विकासासाठी इतर देशांची मदत घेतानाही तंत्रज्ञानाचे

हस्तांतरण करण्यात यावे, अशी भारताची अपेक्षा असते. अमेरिका आणि पूर्वीचे सोव्हिएत रशिया यांची भारताला शस्त्रास्त्रे विकण्यासाठी नेहमी तयारी असे; परंतु तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाला ते फारसे राजी नसत, जेणेकरून भारतात शस्त्रास्त्रांच्या उत्पादनाला मर्यादा पडावी.

**(iii) राजकारणाकडे बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन आणि शांततेचे धोरण :** संघर्षातून सर्व प्रश्न सुटत नाहीत या जाणिवेतून शांततामय मार्गाने प्रश्न सोडवण्याचा वारसा भारताला पूर्वीपासून लाभला आहे. सर्वांना सामावून घेण्याची भारताची सांस्कृतिक परंपरा आहे. स्वातंत्र्य आणि शांततेकडे पाहण्याच्या या दृष्टिकोनामुळेच भारताने अलिप्ततावादाची कास धरली होती. निःशस्त्रीकरणाकडे पाहण्याचा भारताचा दृष्टिकोनही शांततामय मार्गांचा पुरस्कार करतो. त्यामुळेच भारत अण्वस्त्रांच्या बाबतीत संपूर्ण निःशस्त्रीकरणाचा आग्रह धरतो.

देश स्वतंत्र झाल्यापासून ते आजवरची आंतरराष्ट्रीय परिस्थिती आणि भारताच्या संरक्षणाच्या संदर्भात वरील तीन घटकांचा अभ्यास आपण आता करू.

## पर्व पहिले : १९४७ ते १९६२

### आंतरराष्ट्रीय स्थिती :

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक सत्तारचनेत अनेक महत्त्वाचे बदल झाले. अमेरिका आणि रशिया या दोन महासत्ता उदयाला आल्या. त्याचबरोबर आशिया आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींमधून अनेक स्वतंत्र देश जन्माला आले. याच काळात जगात शीतयुद्धाचीही सुरुवात झाली. शीतयुद्ध म्हणजे अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या महासत्तांच्या जगावरील वर्चस्वासाठी सुरू झालेला संघर्ष. त्यातून जगाची दोन गटांत विभागणी झाली. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्य गटात प्रामुख्याने पश्चिम युरोपमधील देशांचा समावेश होता, तर सोव्हिएत रशियाच्या नेतृत्वाखालील पूर्व गटात चीन आणि पूर्व युरोपातील देशांचा समावेश होता. ही विभागणी राजकीय विचारसरणीच्या आधारावर होती आणि दोन्ही गट जगावर आपले वर्चस्व व नियंत्रण वाढवण्याचा प्रयत्न करत होते. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पाश्चात्य गट भांडवलवादी विचारसरणीचा, तर पूर्व गट साम्यवादी विचारसरणीचा पुरस्कार करणारा अशी ही विभागणी होती. अशा या शीतयुद्धाच्या काळात भारत स्वतंत्र झाला.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**शीतयुद्धाच्या काळातील काही महत्त्वाचे लष्करी गट व आघाड्या**

**अमेरिकेच्या लष्करी आघाड्या**

- नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन (NATO) किंवा उत्तर अटलांटिक करार संघटना, १९४९
- अन्झस (ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड व अमेरिकेची आघाडी- ANZUS), १९५१
- साऊथईस्ट एशिया ट्रीटी ऑर्गनायझेशन (SEATO) किंवा आग्नेय आशिया करार संघटना, १९५४
- सेंट्रल ट्रीटी ऑर्गनायझेशन (CENTO) - किंवा मध्यवर्ती करार संघटना, १९५५

**सोव्हिएत रशियाच्या आघाड्या**

- सोव्हिएत रशिया व चीनदरम्यान १९५०मध्ये झालेला लष्करी करार
- वॉर्सा पॅक्ट किंवा वॉर्सा करार, १९५५ (सोव्हिएत रशिया व पूर्व युरोपातल्या साम्यवादी देशांमधला करार)

**कोणत्या देशांना अलिप्ततावादी म्हणायचे?**
**१९६१ च्या बेलग्रेड परिषदेत त्यासंबंधी पुढील निकष ठरवण्यात आले.**

**अलिप्ततावादाचे निकष :**

१. विविध राजकीय व सामाजिक व्यवस्था असलेल्या देशांच्या शांततामय सहजीवनाच्या तत्त्वाच्या आधारावर स्वतःचे स्वतंत्र धोरण आखणारे देश
२. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींना पाठिंबा देणारे देश
३. शीतयुद्धाच्या संदर्भात महासत्तांच्या कोणत्याही बहुस्तरीय आघाडीत समाविष्ट नसलेले देश

४. महासत्तांमधील संघर्षाच्या संदर्भात कोणत्याही द्विपक्षीय किंवा लष्करी आघाड्यांमध्ये समाविष्ट नसलेले देश
५. महासत्तांमधील आपापसातील संघर्षाच्या संदर्भात परकीय सत्तांचा आपल्या भूमीवर लष्करी तळ उभारू न देणारे देश

याच पर्वात अलिप्ततावादी चळवळीचीही सुरुवात झाली. तत्कालीन युगोस्लाव्हियाची राजधानी बेलग्रेड येथे १९६१ मध्ये अलिप्ततावादी देशांची पहिली परिषद झाली. अलिप्ततावादाच्या संकल्पनेत दोन महत्त्वाची तत्त्वे आधारभूत आहेतः जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन आणि शांततावादी दृष्टिकोन. त्यामुळे अलिप्ततावादी देश शीतयुद्धाच्या काळातील महासत्तांच्या आघाड्यांपासून दूर राहिले.

### भारताचे धोरण

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी ७ सप्टेंबर १९४६ रोजी आकाशवाणीवरून केलेल्या भाषणात भारताचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि संरक्षण धोरण यांची मांडणी केली. ते म्हणाले, 'ज्या देशांनी आणि गटांनी एकमेकांविरोधात आघाड्या करून जगाला महायुद्धाच्या दिशेने लोटले, अशा गटतटांच्या सत्ताकारणापासून शक्य होईल तितके दूर राहण्याचा आमचा प्रयत्न राहील.' याचा अर्थ स्पष्ट होता की, त्यावेळी जगात सुरू असलेल्या शीतयुद्धाच्या भांडणांपासून भारत स्वतःला दूर ठेवू इच्छित होता.

नेहरू युगातील भारताच्या संरक्षण धोरणाची उभारणी प्रामुख्याने दोन तत्त्वांवर झालीः जागतिक घडामोडींचे स्वतंत्र आकलन आणि शांततामय मार्गाचा पुरस्कार. हा शीतयुद्धातील संघर्षाचा काळ होता. त्यातील लष्करी आघाड्यांच्या राजकारणापासून स्वतःला दूर राखण्याची भारताची इच्छा होती आणि त्याला मनोमन शांतता हवी होती. तेव्हा या धोरणाची अंमलबजावणी कशी झाली?

भारताने आपल्या या धोरणांची दोन टप्प्यांत कार्यवाही केलेली दिसते.(i) आशिया व आफ्रिका खंडातील देशांमध्ये प्रादेशिक सहकार्याला प्रोत्साहन देणे (ii) अलिप्ततावादी धोरणाची पाठराखण करणे.

भारताने १९४७ मध्ये दिल्लीत आशियाई देशांची प्रादेशिक परिषद आयोजित केली. या आशियाई परिषदेत आशियातील स्वातंत्र्य चळवळींमधील अनेक नेते एकत्र आले. आशिया खंडातील सामाईक प्रश्नांची चर्चा करण्यासाठी आणि आशियात प्रादेशिकवादाची रुजवणूक करण्यासाठी हे नेते एका व्यासपीठावर आले होते.

**तुम्हांला माहीत आहे का?**

**प्रादेशिकतावाद म्हणजे काय?**

विशिष्ट भूप्रदेशातील देश सहकार्याच्या भावनेने एकत्र आल्यास प्रादेशिक संघटना निर्माण होतात. आपापल्या राष्ट्रीय हितसंबंधांच्या संवर्धनासाठी एकमेकांना सहकार्य करणारे गट ते स्थापन करतात. त्यातून स्वतःची स्वतंत्र व विशिष्ट ओळख प्रस्थापित करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अशा संघटनांना 'प्रादेशिक संघटना म्हणतात'. भूप्रदेशाच्या पातळीवर परस्परांना असे सहकार्य करण्याच्या प्रक्रियेला 'प्रादेशिकतावाद' म्हणतात. यात भौगोलिक जवळीकतेला महत्त्व असले, तरी काही वेळा विशिष्ट मुद्दे किंवा विषयांच्या आधारावर प्रादेशिक सहकार्य आकाराला येऊ शकते. दूरसंचार व दळणवळण, ऊर्जानिर्मिती, आरोग्य यासारख्या विषयांमध्ये असे सहकार्य मिळू शकते. अशा प्रादेशिक सहकार्याची प्रक्रिया सामान्यपणे संबंधित देशांमधील राजकीय संवादातून होते. अशा परस्पर संवादातून पुढे संघटना उभी राहते. युरोपीय समुदाय (युरोपियन युनियन), आसियान (असोसिएशन ऑफ साऊथईस्ट एशियन नेशन्स – आग्नेय आशियातील देशांची संघटना) किंवा सार्क (साऊथ एशियन असोसिएशन फॉर रिजनल कोऑपरेशन – दक्षिण आशियाई प्रादेशिक सहकार्य संघटना) यांसारख्या प्रादेशिक संघटना त्याची उत्तम उदाहरणे आहेत.

दुसरी परिषद १९५५ मध्ये इंडोनेशियातील बांडुंग येथे झाली. ही पहिली आफ्रो–आशिया परिषद ठरली. जागतिक राजकारणात आशिया आणि आफ्रिका खंडाचे

स्थान निश्चित करण्यासाठी आणि जगात शांतता प्रस्थापित करण्यात ते काय योगदान देऊ शकतात, हे ठरवण्यासाठी ही परिषद होती. बांडुंग परिषद ही एक ऐतिहासिक घटना होती. आशिया आणि आफ्रिका खंडांमध्ये प्रादेशिकतावादाचा प्रसार करण्यास तिची मदत झाली.

मात्र, १९५० च्या दशकाच्या उत्तरार्धात प्रादेशिकतावादाच्या प्रक्रियेसमोर काही समस्या उभ्या राहिल्या. शीतयुद्धाचा आशिया खंडात प्रवेश झाला. अनेक आशियाई देशांनी अमेरिका किंवा सोव्हिएत रशियाबरोबर लष्करी आघाड्या केल्या. त्यामुळे याच काळात प्रादेशिकतावाद अलिप्ततावादी चळवळीच्या दिशेने वळला. युगोस्लाव्हियातील बेलग्रेड येथे १९६१ मध्ये पहिली अलिप्ततावादी परिषद झाली. अलिप्ततावादी चळवळ ही महासत्तांच्या लष्करी आघाड्यांपासून अंतर राखून होती. त्यामुळे साहजिकच या आघाड्यांमध्ये सहभागी झालेले देश अलिप्ततावादी गटाचे सदस्य झाले नाहीत.



**सन १९६१ मध्ये सुरू झालेल्या अलिप्ततावादी चळवळीचे संस्थापक सदस्य : (डावीकडून) भारताचे पंडित नेहरू, घानाचे नक्रुमा, इजिप्तचे नासेर, इंडोनेशियाचे सुकार्नो आणि युगोस्लाव्हियाचे टिटो.**

**या पर्वात भारताच्या सुरक्षेसमोर अनेक आव्हाने उभी राहिली :**

(i) **१९४७-४८चे भारत-पाकिस्तान युद्ध :** स्वातंत्र्यानंतर लगेचच भारताच्या सैन्याला देशाच्या रक्षणासाठी उभे रहावे लागले. जम्मू आणि काश्मीरमध्ये पाकिस्तानी आक्रमणाला भारतीय सैन्याने पायबंद घातला. पाकिस्तानी फौजांना श्रीनगरपासून काही अंतरावर रोखून धरण्यात भारतीय सैन्याला यश मिळाले. यातून भारताची युद्धसज्जता दिसून आली.

(ii) **राष्ट्रीय एकात्मता :** स्वातंत्र्यानंतर लगेचच हैद्राबाद (१९४८), जुनागड (१९४७) यासारखी संस्थाने आणि नंतर गोव्यासारखा (१९६१) पोर्तुगीजांच्या ताब्यातील प्रदेश यांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण करण्याच्या प्रक्रियेतही भारतीय सैन्याने महत्त्वाची भूमिका बजावली.

(iii) **हिमालयातील शेजारी :** नेपाळ, भूतान आणि तिबेट या हिमालयाच्या पर्वतराजीत वसलेल्या शेजारी देशांशी भारताने सुरक्षाविषयक करार केले. या देशांचे चीनपासून संरक्षण करण्याची जबाबदारी भारताने आपल्या शिरावर घेतली.

(iv) **चीन :** सन १९४९ मध्ये चीन हा साम्यवादी देश बनला. चीनमधील माओ झेडाँग यांच्या सरकारला लगेच मान्यता देणाऱ्या देशांमध्ये भारत होता. मात्र, तिबेटच्या प्रश्नावरून १९५०च्या दशकात भारत आणि चीन दरम्यानच्या संबंधांमध्ये तणाव निर्माण झाला. चीनने तिबेटवर बळाने कब्जा मिळवला. मात्र, या प्रदेशाला चीनने स्वायत्तता द्यावी, अशी भारताची अपेक्षा होती. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी भारत आणि चीन दरम्यान १९५४ मध्ये तिबेट करार झाला. तो पंचशील तत्त्वांवर आधारलेला होता. भारत आणि चीनमध्ये पहिला संघर्ष १९५८ मध्ये अक्साई चीनच्या प्रदेशावरून झाला. सीमारेषेला मान्यता आणि अक्साई चीनचा ताबा ही भारत आणि चीनमधील संघर्षाची मुख्य कारणे होती. याच कारणांवरून पुढे १९६२मध्ये भारत आणि चीनमध्ये युद्ध झाले.

**तुम्हांला माहीत आहे का?**

भारत आणि चीनमधील तिबेटच्या प्रदेशादरम्यान व्यापार व इतर संबंधांबाबत भारतीय प्रजासत्ताक आणि चिनी प्रजासत्ताक (पीपल्स रिपब्लिक ऑफ चायना) यांच्यात १९५४ मध्ये झालेला करार

तिबेटसंबंधीचा हा करार पुढील तत्त्वांवर आधारलेला होता.

- दोन्ही देश परस्परांची प्रादेशिक एकात्मता आणि सार्वभौमत्वाचा आदर राखतील.
- कोणताही देश दुसऱ्यावर आक्रमण करणार नाही. (अनाक्रमणाचा करार)
- कोणताही देश दुसऱ्याच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप किंवा ढवळाढवळ करणार नाही.
- दोन्ही देश समानता आणि सामाईक लाभाचे तत्त्व पाळतील.
- दोन्ही देश शांततापूर्ण सहजीवनाचे पालन करतील.

पंडित नेहरूंच्या काळात भारताच्या संरक्षण धोरणाचा गाभा हा मुख्यत्वे 'राजनैतिक संवाद किंवा राजनयाच्या मार्गाने संरक्षण' हा होता. नव्याने स्वतंत्र झालेला भारत हा एक विकसनशील देश होता. विकासासाठी त्याला भांडवल आणि शांतता दोन्हीची आवश्यकता होती. संरक्षणावरील खर्च वाढला, तर नागरी उद्योगांच्या विकासासाठीचा पैसा त्याकडे वळवावा लागेल, अशी समजूत त्यावेळी होती. तसेच, शेजारील देशांबरोबर सततचा संघर्ष देशांतर्गत विकासासाठी पोषक नाही, अशी भावनाही त्यावेळी दृढ होती. शेजारील देश आणि आशिया-आफ्रिका खंडातील देशांबरोबर भारताचे मैत्रीपूर्ण संबंध विकसित व्हावेत, यासाठी प्रादेशिक सहकार्य आणि अलिप्ततावादाचे धोरण भारताने स्वीकारले होते. या देशांनी परस्परांच्या विकासाला मदत करावी अशी अपेक्षा त्यामागे होती. त्यामुळेच राजनय किंवा राजनैतिक संवाद हा महत्त्वपूर्ण होता. मात्र, 'राजनयाच्या माध्यमातून संरक्षण' ही भूमिका १९६२ नंतर बदलली आणि भारताने संरक्षणावरील खर्चाची तरतूद वाढवली.

## दुसरे पर्व : १९६२ ते १९७१

### आंतरराष्ट्रीय परिस्थिती

१९६० च्या दशकात शीतयुद्धाच्या स्वरूपात काही बदल झाले. १९६२ मध्ये क्युबात क्षेपणास्त्रे तैनात करण्याच्या मुद्द्यावरून सोव्हिएत रशिया व अमेरिकेत तणाव निर्माण झाला. क्युबामधील सोव्हिएत युनियनची क्षेपणास्त्रे हा आपल्यासाठी थेट धोका असल्याचे अमेरिकेने मानले. प्रत्युत्तरादाखल अमेरिकेने क्युबाची सागरी नाकेबंदी केली. १९४५ ला दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरिकी आणि सोव्हिएत रशियाच्या नौका प्रथमच एकमेकांच्या समोर उभ्या ठाकल्या. जग पुन्हा युद्धाच्या उंबरठ्यावर उभे राहिले. युद्ध झालेच, तर त्याचे अण्वस्त्रांच्या युद्धात रूपांतर होण्याचा मोठा धोका होता. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन दोन्ही महासत्तांनी तणाव निवळण्यासाठी प्रयत्न सुरू केले. सोव्हिएत रशियाने क्युबातून क्षेपणास्त्रे मागे घेतली. ही घटना इतिहासात 'क्युबन मिसाईल क्रायसिस' म्हणून ओळखली जाते. १९६२ नंतर दोन्ही महासत्तांनी त्यांच्या दरम्यानचा तणाव कमी करण्याचे प्रयत्न सुरू केले.

### भारताचे धोरण

१९६० च्या दशकात भारताच्या संरक्षणविषयक धोरणात अनेक बदल झाले. पंडित नेहरूंच्या निधनानंतर १९६४ मध्ये लालबहादूर शास्त्री प्रधानमंत्री झाले. 'जय जवान, जय किसान' या घोषणेबद्दल ते प्रसिद्ध आहेत. याच काळात चीनने पहिली अणुचाचणी केली. काश्मीरच्या प्रश्नावरून भारत-पाकिस्तान दरम्यान १९६५ मध्ये पुन्हा युद्ध झडले. या युद्धानंतर शांतता प्रस्थापित करण्यासाठी १९६६ मध्ये तत्कालीन सोव्हिएत रशियामधील ताश्कंद येथे त्रिपक्षीय परिषद झाली. सोव्हिएत रशियाच्या मध्यस्थीने भारत आणि पाकिस्तान दरम्यान शांतता करार झाला. मात्र, प्रधानमंत्री शास्त्रींचा ताश्कंदमध्येच मृत्यू झाला. त्यानंतर इंदिरा गांधी देशाच्या प्रधानमंत्री झाल्या. याच काळात पुढे १९६८ मध्ये अण्वस्त्रप्रसारबंदी करार झाला. याच पर्वात पूर्व पाकिस्तानमध्ये अंतर्गत समस्या उभ्या राहिल्या. त्यातूनच पुढे १९७१ मध्ये भारत-पाकिस्तान दरम्यान युद्ध झाले आणि स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती झाली.



ताश्कंद परिषद (१९६६) पाकिस्तानचे अध्यक्ष मोहंमद अयुब खान आणि भारताचे प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री चर्चा करताना.

**दुसऱ्या पर्वातील काही महत्त्वाच्या घडामोडी पुढीलप्रमाणे :**

(i) **भारताची युद्धसज्जता :** प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या धोरणाचे लक्ष्य प्रादेशिक सहकार्यावरून दक्षिण आशियातील देशांशी द्विपक्षीय संबंध दृढ करण्याकडे वळवले. सीमावर्ती भागांमध्ये रस्तेबांधणीबरोबरच भारतीय सेनादलांची क्षमता वाढवण्यावर त्यांनी आपले लक्ष केंद्रित केले. चीनबरोबरच्या १९६२ च्या युद्धाचा महत्त्वाचा परिणाम म्हणजे त्यावर देशाचे संरक्षण बळकट करण्याच्या दृष्टीने नियोजन व प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी पुढील लक्ष्ये निर्धारित करण्यात आली :

अ) लष्कराचा विस्तार आणि आधुनिकीकरण

ब) हवाई दलाचे आधुनिकीकरण

क) संरक्षणसाहित्य उत्पादनाचा पाया वाढवणे

ड) सीमावर्ती भागामध्ये दळणवळण आणि दूरसंचार सुविधांचा विस्तार व विकास करणे

ई) नौदलातील जुन्या युद्धनौका बाद करून आधुनिक युद्धनौका ताफ्यात आणणे व त्यांची शक्ती वाढवणे. १९६४ मध्ये भारताची संरक्षणाची योजना आखण्यात आली, तीत देशाच्या प्रादेशिक एकात्मतेच्या रक्षणासाठी पुरेशी व सक्षम यंत्रणा उभी करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले.

(ii) **आण्विक धोरण :** चीनने १९६४ मध्ये पहिल्यांदा अणुचाचणी केली. त्यातून भारताच्या आण्विक धोरणात मोठे बदल झाले. (या बदलांची चर्चा पुढे केली आहे.)

(iii) **१९६५ चे युद्ध :** पाकिस्तानी सैन्याने १९६५ मध्ये एकाच वेळी काश्मीर आणि कच्छच्या रणात आक्रमण केले. त्यातून युद्धाचा भडका उडाला. या युद्धात कोणालाच निर्णायक विजय मिळाला नाही. अशा स्थितीत सोव्हिएत रशियाच्या मध्यस्थीने ताश्कंद येथे भारत-पाकिस्तानदरम्यान शांतता तह झाला.

(iv) **भारत-चीन संबंध :** १९६७ मध्ये सिक्कीममधील नथु ला येथे भारत आणि चीनच्या सैनिकांदरम्यान छोटा संघर्ष झाला, तो दोन्ही देशांच्या संबंधांच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. या खिंडीत दोन्ही देशांचे सैनिक समोरासमोर उभे ठाकले, पण भारतीय सैन्याने तिचे यशस्वी रक्षण केले व ही खिंड आपल्याच ताब्यात ठेवली.

(v) **भारत व सोव्हिएत रशिया संबंध :** या पर्वात अमेरिका, सोव्हिएत रशिया आणि चीनच्या आशियासंबंधी धोरणांमध्ये फेरबदल झाले. अमेरिकेने चीनबरोबर वाटाघाटी सुरू केल्या. त्यातून अमेरिका, चीन आणि पाकिस्तान परस्परांना मदत करत असल्याचे चित्र समोर आले. त्याला प्रतिसादादाखल या काळात भारत आणि सोव्हिएत रशिया दरम्यान संरक्षण सहकार्य सुरू झाले. त्याची परिणिती म्हणून १९७१ मध्ये वीस वर्षांच्या काळासाठी भारत-रशिया दरम्यान शांतता आणि मैत्री करार झाला.

(vi) **१९७१चे युद्ध :** पाकिस्तानच्या पूर्व पाकिस्तानातील धोरणांमुळे दक्षिण आशियात मानवी संकट निर्माण झाले. पूर्व पाकिस्तानातील जनतेवर होत असलेल्या पाकिस्तानच्या अत्याचारांमुळे तेथून मोठ्या प्रमाणावर निर्वासित भारतात येऊ लागले. त्यातून १९७१ च्या डिसेंबरमध्ये भारत-पाकिस्तान दरम्यान युद्धाचा

भडका उडाला. या युद्धात पाकिस्तानचा निर्णायक पराभव झाला आणि पूर्व पाकिस्तानचे अस्तित्व संपुष्टात येऊन बांगलादेशाची निर्मिती झाली.

(vii) **सिमला करार :** १९७२ मध्ये हिमाचल प्रदेशातील सिमला येथे भारत-पाकिस्तान दरम्यान शांतता कराराचा मसुदा निश्चित करण्यासाठी परिषद झाली. त्यात भारत-पाकिस्तान दरम्यानचे सर्व प्रश्न शाश्वत शांती (दीर्घ काळ टिकणारी शांतता) आणि द्विपक्षीय संबंधांच्या चौकटीत सोडवण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय झाला.



**सिमला करार (१९७२) :** पाकिस्तानचे प्रधानमंत्री झुल्फिकार अली भुट्टो आणि भारताच्या प्रधानमंत्री इंदिरा गांधी करारावर स्वाक्षरी करताना.

सन १९६२ ते १९७१ हा संक्रमणाचा काळ होता. या काळात भारताच्या सुरक्षा धोरणाचा भर राजनैतिक वाटाघाटी किंवा राजनयातून संरक्षण याऐवजी देशाचे सामरिक सामर्थ्य वाढवण्याकडे झुकला. भारत आता अलिप्ततावादाकडे केवळ शीतयुद्धापासून दूर राहण्यासाठीचे राजकीय धोरण याऐवजी संरक्षणासाठीची व्यूहनीती या दृष्टीने पाहू लागला. त्यातून अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या दोघांशीही वाटाघाटी करण्याचे स्वातंत्र्य भारताला लाभले. दक्षिण आशिया हाच भारताच्या सुरक्षा धोरणाचा कळीचा मुद्दा बनला.

## तिसरे पर्व : १९७२ ते १९९१

### आंतरराष्ट्रीय स्थिती

१९७२ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष रिचर्ड निक्सन आणि सोव्हिएत रशियाच्या साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस लिओनिद ब्रेझनेव्ह यांची मॉस्कोत भेट झाली. दोन महासत्तांदरम्यानच्या मॉस्को शिखरपरिषदेने शीतयुद्धाच्या काळातील तणाव शिथिल होण्यास (Détente – देतान्त) सुरुवात झाली. देतान्त म्हणजे मैत्री नव्हे, तर तणाव निवळणे. अमेरिका आणि सोव्हिएत रशियाने त्यांच्या दरम्यानचा तणाव कमी करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक सुरू केले.

या काळातली आणखी एक महत्वाची घटना म्हणजे अमेरिका आणि चीनच्या संबंधांमध्ये झालेले लक्षणीय बदल. चीनमध्ये १९४९ मध्ये साम्यवादी क्रांती झाल्यानंतर अमेरिकेने तेथील सरकारला अद्याप मान्यता दिली नव्हती. अमेरिकेचे अध्यक्ष निक्सन यांनी १९७२ मध्ये चीनला भेट दिली. या भेटीतून चीनमधील साम्यवादी राजवटीला आपोआपच अमेरिकेची मान्यता मिळाली.

हा तणाव शिथिलनाचा काळ (देतान्त) सोव्हिएत रशियाने १९७९ मध्ये अफगाणिस्तानमध्ये लष्करी हस्तक्षेप केल्याने संपुष्टात आला. अफगाणिस्तानात साम्यवादी राजवट सत्तेवर आली. मात्र, या सरकारला देशांतर्गत मोठा विरोध होता. अफगाणिस्तानातील साम्यवादी राजवटीविरुद्ध अफगाणीस्तानी मुजाहिदिनांनी लढा पुकारला. या मुजाहिदीनांनी पाकिस्तानच्या भूमीवर आश्रय घेतला आणि त्यांना पाकिस्तान व अमेरिका या दोघांकडूनही युद्धासाठी आवश्यक ती मदत पुरवली जाऊ लागली.

एकोणीसशे ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात सोव्हिएत रशियामध्ये काही अंतर्गत बदल झाले. मिखाईल गोर्बाचेव्ह सोव्हिएत रशियाचे सत्ताधीश झाले आणि त्यांनी 'पेरेस्रोयका व ग्लासनोस्त' (खुलेपणा आणि पुनर्रचना) असे धोरण जाहीर करून सुधारणांचा धडाका लावला. त्याचाच एक भाग म्हणून सोव्हिएत रशियाने अफगाणिस्तानातून फौजा मागे घेण्यास सुरुवात केली.

१९८९ मध्ये सोव्हिएत रशियाची शेवटची तुकडी अफगाणिस्तानातून बाहेर पडली. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात युरोपमध्येही अनेक महत्त्वाचे बदल घडले. १९८९ मध्ये पूर्व युरोपात प्रतिक्रांती घडली. ठिकठिकाणच्या साम्यवादी राजवटी स्थानिकांनी उलथून लावल्या आणि आपापल्या देशांत लोकशाही सरकारे स्थापन केली. चेकोस्लोव्हाकिया आणि युगोस्लाव्हिया या मोठ्या देशांचे विघटन झाले आणि अनेक नवे लहान देश जन्माला आले. बर्लिनची भिंत कोसळली आणि पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले. अंतिमतः १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. ही साम्यवादी महासत्ताच कोसळल्याने शीतयुद्ध आपोआपच संपुष्टात आले.

### भारताचे धोरण

स्वतंत्र बांगलादेशाची निर्मिती ही दक्षिण आशियातील महत्त्वाची घटना होती. १९७१पर्यंत भारताला पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान असा दोन्ही आघाड्यांवर धोका होता. भारताने आता बांगलादेशाशी घनिष्ट संबंध विकसित करण्यावर भर दिला. १९७० च्या संपूर्ण दशकात भारताने केवळ दक्षिण आशियावर लक्ष केंद्रित केले. या प्रदेशात भारत प्रमुख सत्ता म्हणून उदयाला आला. १९७४ मध्ये भारताने यशस्वी अणुचाचणी घडवून धाडसी पाऊल उचलले. १९७५ मध्ये सिक्कीमचे भारतात विलीनीकरण झाले. याच कालावधीत भारतापुढे काही अंतर्गत सुरक्षेची आव्हानेही उभी राहिली. सुरुवातीला पंजाबमध्ये आणि नंतर काश्मीरमध्ये अतिरेकी कारवायांना प्रारंभ झाला. १९८४ ला अमृतसरमध्ये खलिस्तानवादी अतिरेक्यांविरुद्ध निर्णायक कारवाई करण्यात आली. त्याच्या प्रतिक्रियेतून त्याच वर्षी प्रधानमंत्री इंदिरा गांधींची राहत्या घरी हत्या झाली. राजीव गांधी देशाचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्या कारकिर्दीतच भारताच्या संरक्षण व्यवस्थेचे आधुनिकीकरण सुरू झाले. त्यांच्यानंतर विश्वनाथ प्रताप सिंह आणि चंद्रशेखर यांनी काही काळ प्रधानमंत्रीपद भूषवले. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नरसिंह राव भारताचे प्रधानमंत्री झाले.

**या पर्वातील काही महत्त्वाच्या घडामोडी :**

(i) **आण्विक धोरण :** चीनने १९६४ मध्ये आण्विक चाचणी घेतली. त्याचा भारताच्या संरक्षणाला असलेला धोका ओळखून तत्कालीन प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी भारताच्या आण्विक धोरणात पहिला महत्त्वाचा बदल केला. आण्विक शस्त्रास्त्रांना असलेला भारताचा विरोध कायमस्वरूपी नसून, शांततापूर्ण उपयोगासाठी आण्विक चाचणी घडवण्याची भारताची इच्छा आहे, असे त्यांनी जाहीरपणे सांगितले. पुढे १९७४ मध्ये भारताने पोखरण येथे पहिली अणुचाचणी केली. त्यावेळीही ही अणुचाचणी शांततामय उपयोगांसाठी आहे आणि अण्वस्त्रे विकसित करण्याचा भारताचा कोणताही इरादा नाही, असे जाहीर करण्यात आले. मात्र, या चाचणीमुळे अण्वस्त्रे बनवू शकण्याच्या भारताच्या क्षमतेचे जगाला दर्शन घडले. या चाचणीचे वर्गीकरण 'शांततामय अणुचाचणी' (पीसफुल न्युक्लियर एक्स्प्लोजन) असे करण्यात येते. याचे कारण अण्वस्त्रे बनवण्याच्या उद्देशाने नव्हे, तर शांततामय उपयोगांसाठी अणुतंत्रज्ञान क्षेत्रात संशोधनाचा मानस त्यामागे होता. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगाची (इंटरनॅशनल ॲटोमिक एनर्जी एजन्सी – आयएईए) अणुशक्तीच्या अशा शांततापूर्ण वापराला मान्यता आहे.

(ii) **सागरी धोरण :** १९४० च्या दशकापर्यंत ब्रिटिश नाविक दलाचे हिंदी महासागर परिसरात मोठे अस्तित्व होते. १९६८ मध्ये ब्रिटनने सुएझ कालव्याच्या पूर्वेकडील नाविक दल मागे घेण्याची घोषणा केली. त्यानंतर अमेरिका आणि सोव्हिएत रशियाच्या युद्धनौकांनी हिंदी महासागरात संचार सुरू केला आणि आपले नाविक तळ उभारण्यासही सुरुवात केली. या घडामोडीला 'हिंदी महासागरात वर्चस्वासाठी स्पर्धा' असे संबोधले जाते. ब्रिटिशांनी त्यांचे आरमार हिंदी महासागरातून मागे घेतल्याने तेथे पोकळी निर्माण झाली. ती भरून

काढण्यासाठी दोन महासत्तांमध्ये चढाओढ सुरू झाली, असे स्पष्टीकरण त्यासाठी देण्यात आले. भारताचा अशा वैचारिक मांडणीला विरोध होता आणि हिंदी महासागर हे "शांतता क्षेत्र" जाहीर करावे, अशी मागणी भारताने केली. १९७१ च्या युद्धात भारतीय नौदलाने सक्रिय भूमिका बजावली. त्यानंतर भारताला नौदलाचे महत्त्व लक्षात आले आणि नौदलाचे सामर्थ्य वाढवण्याचे प्रयत्न सुरू झाले.

(iii) **श्रीलंका :** १९७० च्या दशकात श्रीलंकेमध्ये वांशिक संघर्ष सुरू झाला. श्रीलंकेतील तामिळ आणि तेथील सरकार एकमेकांविरोधात उभे राहिले. ऐंशीच्या दशकात हा संघर्ष वाढतच गेला. श्रीलंकेतील या यादवी युद्धात भारताने मध्यस्थी करावी व शांततेसाठी प्रयत्न करावेत, अशी विनंती तेथील सरकारतर्फे करण्यात आली. त्यानुसार भारत आणि श्रीलंकेदरम्यान १९८७ मध्ये करार झाला. या करारानुसार भारताने श्रीलंकेत शांतिसेना (इंडियन पीसकिपिंग फोर्स) पाठवली.



**भारत-श्रीलंका करार (१९८७) :** भारताचे प्रधानमंत्री राजीव गांधी आणि श्रीलंकेचे अध्यक्ष ज्युनियस रिचर्ड जयवर्धने

(iv) **मालदीव :** १९८८ मध्ये मालदीवमधील सरकार उलथून लावण्याचा प्रयत्न केला गेला. त्यावेळी भारताने तातडीने सैनिकी कारवाई करून मालदीवमधील लोकनियुक्त सरकार पुन्हा स्थापित केले.

(v) **संरक्षण तंत्रज्ञान :** भारताने १९८३ मध्ये एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम (इंटिग्रेटेड गाईडेड मिसाईल डेव्हलपमेंट प्रोग्रॅम) सुरू केला. त्याने भारताच्या क्षेपणास्त्र तंत्रज्ञान विकासाची पायाभरणी झाली. त्याअंतर्गत उच्च तंत्रज्ञान व क्षमता असलेली विविध प्रकारची क्षेपणास्त्रे विकसित करण्यात आली. त्यामध्ये पृथ्वी, अग्नी क्षेपणास्त्रे, ध्वनीपेक्षा जास्त वेगाने प्रवास करणारी ब्राह्मोस क्रूझ क्षेपणास्त्रे, निर्भय सबसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्रे, पाणबुडीवरून मारा करता येऊ शकणारी के-४ व के-१५ बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे, हवाई हल्ल्यापासून संरक्षणासाठी जमिनीवरून आकाशात मारा करू शकणारी प्रद्युम्न व पृथ्वी क्षेपणास्त्रे, आकाशातून आकाशात मारा करू शकणारी क्षेपणास्त्रे आदींचा समावेश आहे.

(vi) **अंतर्गत सुरक्षा :** भारतातील पूर्वोत्तर राज्यांमध्ये स्वातंत्र्यापासूनच अंतर्गत बंडखोरीच्या काही समस्या होत्या. निमलष्करी दले आणि सशस्त्र सेनादले त्यांना नियंत्रणात राखण्याचे काम करत होती. मात्र, १९६० च्या दशकात नक्षलवादाच्या रूपाने नवी समस्या उभी राहिली. १९७० च्या दशकात केंद्र सरकारने विविध उपाययोजनांद्‌वारे ती नियंत्रित ठेवली. पुढे स्वतंत्र खलिस्तानच्या मागणीच्या स्वरूपात पंजाबमध्ये फुटीरतावादाची समस्या उभी राहिली. १९८० च्या दशकात तिने उग्र रूप धारण केले. त्यावेळी केंद्र सरकारला पंजाबमधील अतिरेक्यांविरुद्‌ध कठोर उपाययोजना करावी लागली. त्यानंतर काश्मीरमध्ये नव्या प्रकारचा दहशतवाद सुरू झाला. ऐंशीच्या दशकाच्या उत्तरार्धात अफगाणिस्तानातील मुजाहिदीन काश्मीरच्या खोऱ्यात घुसू लागले आणि भारतविरोधी कारवाया करू लागले.

भारत १९७१ नंतर दक्षिण आशियातील महत्त्वाची सत्ता म्हणून उदयाला आला. या पर्वात भारताने आपले सामर्थ्य टप्प्याटप्प्याने वाढवत नेले. १९७४ मध्ये भारताने केलेली अणुचाचणी शांततेसाठी होती, तरी त्यातून अण्वस्त्र बनवू शकण्याच्या भारताच्या क्षमतेचे प्रदर्शन जगाला घडले. श्रीलंका आणि मालदीवमधील मोहिमांमुळे दक्षिण आशियातील सुरक्षा आणि

स्थिरतेबद्दल भारत सजग आहे, हेही जगाला दिसले. मात्र, याच काळात भारतातील अंतर्गत समस्याही वाढल्या. पंजाबमधील दहशतवादामुळे भारतापुढे आव्हान उभे राहिले. काश्मीरमधील दहशतवादी कारवायाही या काळात वाढत गेल्या.

## पर्व चौथे : १९९१ ते आजपर्यंत

### आंतरराष्ट्रीय परिस्थिती

१९८९ ते १९९१ या काळात आंतरराष्ट्रीय पातळीवर काही महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. १९८९ मध्ये पूर्व युरोपातील देशांमध्ये प्रतिक्रांती होऊन तिथल्या साम्यवादी राजवटींचा अस्त झाला. १९९० मध्ये इराकने कुवेतचा बळजबरीने ताबा घेतला. त्यातून १९९० चे कुवेत युद्ध उद्भवले. १९९१ मध्ये सोव्हिएत रशियाचे विघटन झाले. त्यातून शीतयुद्धाच्या समाप्तीवर शिक्कामोर्तब झाले.

एकोणीसशे नव्वदच्या दशकाच्या प्रारंभी शीतयुद्धोत्तर काळाचे वर्णन करण्यासाठी जागतिकीकरण (ग्लोबलायझेशन) हा शब्दप्रयोग मोठ्या प्रमाणात वापरात आला. जागतिकीकरण या शब्दाची व्याप्ती मोठी आहे. त्यात १९९१ नंतर जगात घडलेल्या आर्थिक, राजकीय, वैचारिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि तंत्रज्ञानातील बदलांचा समावेश होतो. त्यामुळेच सध्या जागतिकीकरण हा शब्द आपण शीतयुद्धोत्तर जगाचे वर्णन करण्यासाठी वापरतो. जागतिकीकरणामुळे विविध देश आणि त्यांमधील लोकांचे परस्परांशी संबंध आणि संवाद मोठ्या प्रमाणावर वाढला. मानवी इतिहासात प्रथमच जग एकमेकांशी इतक्या मोठ्या प्रमाणावर जोडले गेले, असे आपण म्हणू शकतो. विविध तंत्रज्ञानांच्या विकासाने जगाची ही 'इंटरकनेक्टिव्हिटी' वाढली.

### भारताचे धोरण

एकोणीसशे ऐंशीच्या उत्तरार्धात भारतापुढे मोठे आर्थिक संकट उभे राहिले. त्यामुळे १९९१ मध्ये प्रधानमंत्री नरसिंह राव यांनी आर्थिक उदारीकरणाच्या प्रक्रियेला सुरुवात केली. त्यातून भारताची अर्थव्यवस्था सावरली आणि तिने नवी उभारी घेतली. मात्र, १९९६ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. त्यातून देशाला स्थिर सरकार मिळू शकले नाही. हा काळ राजकीय अस्थिरतेचा होता. या कालावधीत अटलबिहारी वाजपेयी, एच. डी. देवेगौडा, इंद्रकुमार गुजराल यांची सरकारे देशाने पाहिली. १९९८ मध्ये पुन्हा सत्तेवर आलेल्या वाजपेयी सरकारच्या काळात भारताने पोखरण येथे सलग अणुचाचण्या घेतल्या आणि भारत आता अण्वस्त्रसज्ज देश झाल्याचे जाहीर केले. १९९९ मध्ये कारगिलचे युद्ध झाले. या परिसरातली पाकिस्तानी सैन्याची घुसखोरी भारताने निपटून काढली. त्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (नॅशनल डेमॉक्रॅटिक अलायन्स-एनडीए) सरकार पुन्हा सत्तेवर आले. २००४ मध्ये सत्तांतर होऊन काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली संयुक्त पुरोगामी आघाडीचे (युनायटेड प्रोग्रेसिव्ह अलायन्स- यूपीए) सरकार सत्तेवर आले. डॉ. मनमोहन सिंह देशाचे प्रधानमंत्री झाले. त्यांच्या नेतृत्वाखालील सरकारने सलग दहा वर्षे देशाचा कारभार पाहिला. याच काळात भारत-अमेरिका अणुकरारावर स्वाक्षरी झाली. त्यानंतर २०१४ मध्ये पुन्हा सत्तांतर होऊन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे (एनडीए) सरकार सत्तेवर आले.

**१९९१ नंतरच्या काळात झालेले काही बदल पुढीलप्रमाणे :**

(i) **भारत-अमेरिका संवाद :** संरक्षण व सामरिक क्षेत्रात भारत आणि अमेरिकेमधील संबंधांमध्ये उत्तरोत्तर सुधारणा होत गेली. नागरी अणुऊर्जा तंत्रज्ञानासंबंधी सहकार्यासाठी भारत व अमेरिकेदरम्यान झालेला अणुकरार हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

(ii) **इंडोपॅसिफिक :** इंडोपॅसिफिक क्षेत्रासंबंधात काही महत्वाचे पुढाकार घेतले गेले. पूर्व आशियायी राष्ट्रांशी जवळचे संबंध प्रस्थापीत करण्यासाठी सुरुवातीला "लुक ईस्ट" व नंतर "ॲक्ट ईस्ट" ही धोरणे आखली गेली.

(iii) **पाकिस्तानशी संबंध :** काश्मीरमध्ये पाकिस्तानने

पुरस्कृत केलेल्या दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली. १९९९ मध्ये पाकिस्तानी सैन्याने कारगिल परिसरात केलेल्या घुसखोरीमुळे दोन्ही देशांमध्ये युद्ध झाले.

(iv) **बदलते सामरिक धोरण :** पाकिस्तान आणि चीन या दोन्ही देशांच्या संदर्भात भारताने आपल्या भूमिकेत बदल केला. भारताचे राष्ट्रीय संरक्षण धोरण अधिक आक्रमक आणि सक्रिय बनले. म्यानमार (२०१५), बालाकोट (२०१९); चुमार (२०१४) आणि डेमचोक (लडाख २०१४) आणि डोकलाममध्ये झालेली घुसखोरी (२०१७) व भारताचा ठाम विरोध आदी घटनांमधून भारताच्या बदललेल्या सामरिक धोरणांचे दर्शन घडले.

भारताचे संरक्षण धोरण १९९१ नंतर मोठ्या प्रमाणात बदलले. भारताने अमेरिका, इस्रायल आणि युरोपिय समुदायासमवेत घनिष्ट सामरिक संबंध प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. भूतपूर्व सोव्हिएत रशियाशी भारताचे मैत्रीपूर्ण संबंध होते. त्याच्या विघटनानंतर अस्तित्वात आलेल्या रशियाशीही भारताचे चांगले संबंध कायम आहे. भारताने पाश्चिमात्य देशांशीही संरक्षण क्षेत्रात सहकार्याबद्दल बोलणी सुरू केली आहेत. या काळात भारताचे सुरक्षाविषयक धोरण अधिकाधिक वास्तववादी बनत गेले आणि आदर्शवादावर आधारित धोरण हळूहळू मागे पडत गेले. आर्थिक स्थैर्य आणि प्रगती, राजकीय स्थैर्य, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात (विशेषतः आण्विक, अवकाश आणि माहिती तंत्रज्ञान) चमकदार कामगिरी आदी घटकांमुळे भारताने जागतिक राजकारणात आता महत्त्वाचे स्थान मिळवले आहे.

**शोधा आणि चर्चा करा**

भारताने म्यानमार (२०१५), बालाकोट (२०१९), चुमार (२०१४), डेमचोक (२०१४) आणि डोकलाममध्ये (२०१७) झालेली घुसखोरी यासंदर्भात आखलेल्या मोहिमा व दिलेल्या प्रत्युत्तराबद्दल अधिक माहिती मिळवा. या प्रत्येक मोहिमेसंबंधी टिपा लिहा आणि त्यांची वर्गात चर्चा करा.

**तुम्हांला माहीत आहे का?**

एखादा आंतरराष्ट्रीय करार केल्यानंतर तो लगेचच आपोआप लागू होत नाही. साधारणपणे आंतरराष्ट्रीय कराराच्या तरतुदी कोणत्या तारखेपासून अमलात येतील, याची निश्चित कालरेषा करारात नमूद केलेली असते. तसेच, ठराविक कालावधीपर्यंत विविध देशांनी करार स्वीकारणे व त्याला मान्यता देणे अपेक्षित असते. त्यासाठी काही वेळा किमान संख्येचेही बंधन असते.

उदाहरणार्थ, १९६८ मध्ये अण्वस्त्रप्रसारबंदी करारावर स्वाक्षऱ्या झाल्या, मात्र तो स्वीकारणाऱ्या देशांची विशिष्ट संख्या झाल्यानंतर १९७० नंतरच त्याची अंमलबजावणी सुरू झाली.

### सुरक्षा धोक्यांचे आकलन आणि व्यूहरचना यांवर एक दृष्टिक्षेप

| | १९४७-१९६२ | १९६२-१९७२ | १९७२-१९९१ | १९९१ ते आजपर्यंत |
|---|---|---|---|---|
| **सुरक्षा धोक्यांचे आकलन** | शेजारील देशांकडून पारंपरिक धोका: पाकिस्तानवर लक्ष केंद्रित | पारंपरिक धोक्याची प्रचीती. आता पाकिस्तान व चीन दोन्हीवरही लक्ष | पारंपरिक धोके कायम. अंतर्गत सुरक्षा समस्यांमध्ये वाढ, त्याचे बंडखोरी व कमी तीव्रतेच्या संघर्षांत रूपांतर (पंजाब व काश्मीर) | धोक्यांचे स्वरूप आता जागतिक. आर्थिक स्थिती, व्यापार व तंत्रज्ञानासारख्या मुद्द्यांचे महत्त्व वाढले. दहशतवादाशी संबंधित प्रादेशिक समस्यांमध्ये वाढ. |
| **राष्ट्रीय सुरक्षेच्या व्यूहरचना आणि राष्ट्रीय सामर्थ्याचे संदर्भ** | अ) राजनैतिक वाटाघाटींद्वारा संरक्षण.<br>ब) शीतयुद्धाच्या काळातील द्विध्रुवीय लष्करी आघाड्यांच्या पार्श्वभूमीवर विकसित धोरण.<br>क) प्रादेशिक सहकार्य हे प्रमुख धोरण. (आशिया व आफ्रो-आशिया)<br>ड) राष्ट्रीय सामर्थ्य मुख्यत: सैन्यशक्तीवर अवलंबून | अ) राजनैतिक वाटाघाटींच्या मर्यादा १९६२ च्या युद्धामुळे उघड.<br>ब) राष्ट्रीय सुरक्षेसाठी लष्करी सामर्थ्य विकसित करणे अपरिहार्य असल्याची जाणीव.<br>क) दक्षिण आशियात द्विपक्षीय संबंधांना प्राधान्य.<br>ड) सैन्यशक्तीबरोबरच अर्थव्यवस्था हाही राष्ट्रीय सामर्थ्यातील महत्वाचा घटक | अ) लष्करी सामर्थ्य विकसित करण्यावरील भर कायम<br>ब) राजकीय-लष्करी व्यूहरचनेतून संरक्षणाला महत्त्व<br>क) तंत्रज्ञानाचा दुहेरी वापर या घटकाला वाढते महत्त्व<br>ड) दक्षिण आशियावर लक्ष केंद्रित करून प्रादेशिक सत्ता बनण्यावर भर<br>ई) राष्ट्रीय सामर्थ्याचे केंद्रबिंदू आता आर्थिक आणि तंत्रज्ञानाच्या क्षमता. | अ) आर्थिक उदारीकरण (१९९१) आणि भारत-अमेरिका नागरी अणुसहकार्य करार (२००८) हे महत्त्वाचे टप्पे<br>ब) तंत्रज्ञानाच्या दुहेरी वापराच्या संदर्भात लादण्यात आलेल्या निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर आर्थिक व राजकीय स्थैर्य, तंत्रज्ञानातील प्रगती. या पार्श्वभूमीवर जागतिक राजकारणातील निर्णयप्रक्रियेत स्थान देण्याची भारताची मागणी<br>क) आर्थिक, लष्करी आणि तंत्रज्ञानाच्या सामर्थ्यावर संरक्षण<br>ड) केवळ दक्षिण आशियापुरते मर्यादित न राहता भारताचे परराष्ट्र धोरण जागतिक व वास्तववादी बनले.<br>ई) तंत्रज्ञान हा राष्ट्रीय सामर्थ्याचा मुख्य घटक बनला.<br>फ) पाकिस्तानपुरस्कृत दहशतवादी कारवायांसंदर्भात भारताचे आक्रमक धोरण |

## स्वाध्याय

**प्र. १ (अ) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा.**

(i) अलिप्ततावादाचा एक मुख्य निकष .................... हा आहे.

(अ) शीतयुद्धातील लष्करी गटात सहभागी होणे.

(ब) अमेरिकेला लष्करी तळ पुरवणे.

(क) सोव्हिएत रशियाला नाविक तळ पुरवणे.

(ड) परराष्ट्र धोरणात स्वतंत्र भूमिका राखणे.

(ii) सिमला करार(१९७२) .................. यावर आधारीत होता.

(अ) बहुस्तरीय राजनयाला मान्यता

(ब) सोव्हिएत रशियाची मदत स्वीकारणे

(क) द्विपक्षीय संबंधाची तत्त्वे

(ड) अमेरिकेची मदत स्वीकारणे

**(ब) योग्य कारण देऊन वाक्ये पूर्ण करा.**

(i) भारताच्या आण्विक धोरणात प्रधानमंत्री लालबहादूर शास्त्री यांनी प्रथम बदल केले, कारण...

(ii) हिंदी महासागरात बड्या सत्तांची स्पर्धा निर्माण होण्याचे कारण...

**(क) खालील विधानाबाबत योग्य संकल्पना लिहा.**

(i) १९७० च्या दशकात अमेरिका व सोव्हिएत रशिया दरम्यानचा तणाव कमी होणे.

**(ड) गटात न बसणारा शब्द शोधा.**

(i) नथु ला, बालाकोट, चुमार, डेमचोक

**प्र. २ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा.**

(i) १९७२ च्या मॉस्को शिखर परिषदेनंतर देतांतची प्रक्रिया सुरू झाली.

(ii) भारतात १९८३ साली क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाचा पाया हा एकात्मिक मार्गदर्शित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाने निर्माण केला गेला.

**प्र. ३ सहसंबंध स्पष्ट करा.**

(i) शीतयुद्धकालीन लष्करी गट आणि अलिप्ततावाद.

**प्र. ४ आपले मत नोंदवा.**

(i) भारताने बालाकोटमध्ये केलेल्या कारवाईनंतर पाकिस्तानचा काश्मीरमधील दशहतवादाला असलेला पाठिंबा थांबेल का ?

**प्र. ५ खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.**

(i) १९९१ नंतर भारताच्या सुरक्षा धोरणामध्ये कोणते बदल झाले ?

**उपक्रम**

सर्व अलिप्ततावादी शिखर परिषदांची यादी करा. प्रत्येक परिषदेत कोणते महत्वाचे मुद्दे चर्चिले गेले ?